महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर https://jeevandeepvarta.com मुख्य संपादक – रवींद्र घोडविंदे Rs.2/-

शनिवार ■ 25 जानेवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 211 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# सहकार क्षेत्रासाठी शरद पवारांनी काय केले?

## मालेगावच्या सभेत अमित शहा कडाडले



**महाराष्ट्रात सहकारी साखर कारखान्यांचा ४६ हजार कोटी रुपये टॅक्स कमी करण्याचं काम आमच्या सरकारने केलं. पवार साहेब आपण १० वर्ष कृषी मंत्री राहिलात, त्यावेळी सहकार क्षेत्र आपल्याकडे होतं, आपण महाराष्ट्रातील साखर कारखान्यांसाठी, सहकरासाठी काय केलं? मार्केटिंग नेता बनून फिरणं सोपं आहे, जमिनीवर राहून काम करणे गरजेचं असतं असा हल्लाबोल यावेळी अमित शाह यांनी शरद पवारांवर केला आहे.**

दै·ठाणे जीवनदीप वार्ता

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पुन्हा एकदा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर जोरदाह हल्लाबोल केला आहे. ते मालेगावमध्ये बोलत होते. पवार साहेब आपण 10 वर्ष कृषी मंत्री राहिलात, त्यावेळी सहकार क्षेत्र आपल्याकडे होतं, आपण महाराष्ट्रातील साखर कारखान्यांसाठी, सहकारासाठी काय केलं? असा सवाल यावेळी अमित शाह यांनी उपस्थित केला आहे. तसेच महाराष्ट्रात सहकारी साखर कारखान्यांचा 46 हजार कोटी रुपये टॅक्स कमी करण्याचं काम आमच्या सरकारने केलं असंही त्यांनी यावेळी म्हटलं. लाल बहादुर शास्त्री यांनी जय जवान जय किसानचा नारा दिला, नरेंद्र मोदी यांनी जय विज्ञानचा नारा दिला. सहकाराच्या माध्यमातून चालवलं गेलं तर शेतीमध्ये निश्चित फायदा होतो. शेतकरी परंपरागत शेती करतो, अत्याधुनिक भूमी परीक्षण प्रयोगशाळा इथे तयार करण्यात आली आहे. पाण्याची पीए मात्रा किती आहे याचा अभ्यास देखील याठिकाणी केला जातो आहे. 1500 गिर गाई आहेत, त्यातून सगळ्या प्रकारचे प्रोडक्ट तयार होतील. यामुळे ऑरगॅनिक शेतीची सुरुवात देखील होईल. ऑरगॅनिक लॅबोरेटरी सुरू करा, भारत सरकार तुम्हाला मदत करेल असे मी शिवाजीराव यांना सांगितलं आहे. सहकार मंत्रालयाने ऑरगॅनिक को ऑपरेटिव्ह लिमिटेड तयार केले आहे. या माध्यमातून येणारा फायदा थेट शेतकऱ्यांच्या अकाऊंटवर जाणार आहे. त्यासाठी लागणारे प्रमाणपत्र ही संस्था देणार आहे. आत्म निर्भरतेची सर्वात सुंदर व्याख्या सहकार आहे. त्यामुळे मोदींनी सहकार ते समृद्धी असा नारा दिला आहे. या संस्थेत 1 लाखांहून अधिक सदस्य आहेत इथे अत्यंत सुंदर ड्रिप व्यवस्था आहे. 80 टक्के शेती इथे ड्रीपद्वारे होते, असं अमित शाह यांनी म्हटलं आहे.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीची प्रक्रिया पेपरलेस!

दै·ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील गरजू रूग्णांना अत्यावश्यक आरोग्यसेवा पुरविण्यासाठी, आर्थिक सहाय्य देण्याकरिता मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष कार्यरत आहे. या कक्षात सादर झालेल्या अर्जाचा पाठपुरावा करण्यासाठी रुग्ण व त्यांचे नातेवाईक मंत्रालयात येत असतात. नागरीकांना या सेवा त्यांच्याच जिल्ह्यात सहजपणे उपलब्ध व्हाव्यात याकरीता राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात "मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष" सुरु करण्यात येणार असून याबाबत शासननिर्णय २२ जानेवारी २०२५ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. या निर्णयामुळे नागरीकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या प्रकरणांची माहिती त्यांच्याच जिल्ह्यात उपलब्ध होणार आहे. यामुळे नागरीकांना वेळ व पैशाचा अपव्यय टाळता येईल. यासह मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक सुलभ व पेपरलेस होत आहे. महागड्या वैद्यकीय उपचारांसाठी गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना आर्थिक मदत मिळविण्याची प्रक्रिया पूर्णतः पेपरलेस करण्यात येणार असून या प्रक्रियेसाठी मंत्रालयात येण्याची आवश्यकता राहणार नाही. याकरिता लवकरच स्वतंत्र ऑनलाइन प्रणाली देखील विकसित करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी दिली आहे.

सध्याच्या प्रचलित कार्यपद्धतीप्रमाणे रुग्णाला दिला जाणारा एओ क्रमांक आणि एम क्रमांक एकत्र करण्यात येणार आहे. या सुविधेमुळे निधीच्या अर्जाची प्रक्रिया अधिक गतिशिल, सोपी होणार आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाने आतापर्यंत राज्यातील हजारो गरजू रुग्णांना जीवनदान दिले आहे. राज्य शासनाच्या या उपक्रमामुळे राज्यातील आरोग्यसेवा अधिक सक्षम आणि लोकाभिमुख होईल, अशी अपेक्षा व्यक्त करत असताना कक्षाच्या माध्यमातून देण्यात येणाऱ्या सुविधांचा गरजू रुग्णांनी अधिकाधिक प्रमाणात लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

**थोडक्यात महत्वाचे**

## प्रदूषण नियमांचे उल्लंघन ठाण्यातील बांधकामावर कारवाई

दै·ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : शहरात बांधकाम सुरू असताना हवा प्रदूषण रोखण्यासाठी महापालिकेने विकासकांना नियम आखून दिले आहेत. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ०७ विकासकांना काम थांबविण्याचे आदेश महापालिकेच्या शहर विकास विभागाकडून देण्यात आले आहेत, अशी माहिती सहाय्यक संचालक नगररचना संग्राम कानडे यांनी दिली. प्रदूषण नियंत्रण नियमावलीची पूर्तता केल्यावर या विकासकांना काम सुरू करण्याची परवानगी दिली जाणार आहे. ठाणे शहरातील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी महापालिकेमार्फत विविध उपाय योजना आखल्या जात आहेत. त्यानुसार, महापालिकेने धूळ प्रदूषण नियंत्रणासाठी एकूण ३१७ बांधकाम व्यावसायिकांना हवा प्रदूषण नियंत्रण मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याचे निर्देश दिले होते. त्यापैकी १८२ ठिकाणी दंडात्मक कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून नियमांच्या पूर्ततेसोबतच ०९ लाख २५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. या नियमावलीचे उल्लंघन करणाऱ्या १२० बांधकाम व्यावसायिकांना काम का थांबवू नये यासाठी कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. त्यांच्यापैकी ज्यांनी नियमांची पूर्तता केल्याचा अहवाल सादर केला, त्याची पडताळणी केली जात आहे. तर, नोटीस बजावण्यात आलेल्या सात विकासकांनी नियमांची पूर्तता केलेली नसल्यामुळे त्यांना काम थांबविण्याचे आदेश देण्यात आले आहेत, अशी माहिती सहाय्यक संचालक नगररचना संग्राम कानडे यांनी दिली

## बदलापूर - नवी मुंबई एक्सेस कंट्रोल मार्गासाठी एमएमआरडीएच्या निविदा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : एमएमआरमधील मुंबई, नवी मुंबई या शहरांपर्यंत जाण्यासाठी सध्या डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर या शहरांतील प्रवाशांना मोठा वळसा घालून जावे लागतो. हा वेळखाऊ प्रवास लवकरच थांबणार असून बदलापूरहून थेट मुंबई, नवी मुंबई गाठण्यासाठी प्रस्तावित असलेल्या एक्सेस कंट्रोल मार्गाच्या उभारणीसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अर्थात एमएमआरडीएने निविदा मागवल्या आहेत.

ही सर्व शहरे महामार्गाशी थेट जोडली गेल्यास शहरातून बाहेर पडण्यासाठी लागणारा वेळ कमी होऊन शहरांतर्गत वाहतूक कोंडीमुक्त होण्यास मदत होणार आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी २०२३ मध्ये या रस्त्यची मागणी केली होती. ठाणेपल्याड वाहतूक व्यवस्थेला गती देण्यासाठी अनेक महत्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येत आहेत. यापैकीच एक महत्त्वाचा प्रकल्प म्हणजे मुंबई – नवी मुंबई ते थेट कल्याण बदलापूर ॲक्सेस कंट्रोल महामार्ग आहे. या मार्गाच्या उभारणीसाठी कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी सर्वप्रथम मागणी केली होती. एमएमआरडीएच्या वतीने या मार्गावर काम सुरू होते. महानगर आयुक्त संजय मुखर्जी यांनीही या मार्गासाठी पुढाकार घेतला होता. बदलापूर, उल्हासनगर, अंबरनाथ, कल्याण, डोंबिवली या शहरांना थेट मुंबई तसेच नवी मुंबई या शहरांशी कशा पद्धतीने जोडता येईल याची चाचपणी सुरू होती. अखेर एमएमआरडीएच्या वतीने या एक्सेस कंट्रोल महामार्गाच्या उभारणीसाठी प्रकल्प सल्लागार नेमण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. त्या अंतर्गत एमएमआरडीएने सविस्तर प्रकल्प आराखडा तयार करण्यासाठी निविदा मागवल्या आहेत. हा मार्ग झाल्यास बदलापूर ते नवी मुंबई आणि मुंबई हा प्रवास गतीमान होईल.

### असा असेल मार्ग

बदलापूर येथून जात असलेल्या मुंबई वडोदरा राष्ट्रीय महामार्गाच्या येथून या रस्त्याची सुरुवात करण्याचा एमएमआरडीएचा मानस आहे. यामार्गाला पुढे पालेगाव - हेदुटणे मार्गाला जोडण्याची शक्यता आहे. येथे मेट्रो – १२ ची उभारणी सुरू आहे. तसेच येथून कल्याण रिंग रोडचा प्रकल्पही जोडला जातो.




# मध्यरात्रीपासून एसटीची भाडेवाढ लागू

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्याच्या ग्रामीण भागाची जीवनवाहीनी म्हटली जाणाऱ्या एसटीच्या तिकीट दरात वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. राज्य परिवहन प्राधिकरणाच्या बैठकीत एसटीच्या भाडे वाढीला मंजूरी देण्यात आली आहे. येत्या २५ जानेवारीपासून ही दरवाढ लागू करण्यात आली आहे. त्यामुळे सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशावर मोठा भार येणार आहे. राज्य परिवहन प्राधिकरणाची २७६ वी बैठक परिवहन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव , राज्य परिवहन प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली आज संपन्न झाली. या बैठकील राज्य परिवहन प्राधिकरणाचे सदस्य अतिरिक्त पोलीस महासंचालक (वाहतुक) आणि परिवहन आयुक्त देखील उपस्थित होते. या बैठकीत एसटीला १४.९५ टक्के भाडे वाढ करण्यास मंजूरी मिळाली आहे.

> **"आज मी राज्याच्या प्रधान सचिवांबरोबर चर्चा केली. तेव्हा त्यांनी सांगितलं की गुरुवारी एक महत्वाची बैठक झाली. त्या बैठकीत एसटीच्या भाडेवाढीबाबत निर्णय घेण्यात आला आहे. कारण गेल्या अनेक वर्षांपासून एसटीची भाडेवाढ करण्यात आली नव्हती. आता एसटीची १४.९७ टक्के भाडेवाढ करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. तसेच एसटीची ही भाडेवाढ आजपासून लागू करण्यात येणार आहे"**
> **- प्रताप सरनाईक परिवहन मंत्री**

# भाताला योग्य हमीभाव मिळवून देणार – आ. किसन कथोरे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता




शेतकऱ्यांच्या भातासाठी वाढिव हमीभाव देण्यासाठी प्रयत्न करणार-आमदार किसन कथोरेमुरबाड-प्रतिनिधी(दिलीप पवार)शेतकऱ्यांना आज अनेक संकटाचा सामना करावा लागत आहे त्यांनी काबाडकष्टाने पिकवलेला शेतमाल कधी कवडीमोल भावाने विकावा लागतो तर कधी निसर्ग कोपतो मुरबाड तालुका हा कृषी प्रधान तालुका आहे त्यामुळे शेतकऱ्यांनी पिकवलेल्या भाताला सध्या शासन 2300 रुपये हमीभाव देऊन खरेदी करत आहे तो तोकडा असून 3500 ते 4000 हमीभाव देण्यासाठी शासन दरबारी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे यांनी माळ आदिवासी खरेदी केंद्राच्या खापरी येथे धान खरेदी केंद्राच्या उद्घाटनावेळी केले.आमदार किसन कथोरेंच्या पुढाकाराने आदिवासी सेवा सोसायटी माळ यांच्या वतीने हे भात खरेदी केंद्र सुरु झाले असून यावर्षी कारभार सुधारा पुढिल वर्षी लवकरच केंद्र सुरु होईल अशी सूचना या वेळी आमदार कथोरे यांनी चेअरमन, सचिव व संचालक मंडळाला केली. तसेच शासनाकडे असलेले कमिशनचे 54 लाख रुपये लवकरच मिळवून देण्यासाठी संबधितांशी चर्चा करणार असल्याची ग्वाही दिली तर उपस्थित शेतकऱ्यांना सौर ऊर्जा सारख्या योजना राबवून आपली आर्थिक बचतीचे आवाहन केले.तर संजय शेळवले या शेतकऱ्याला प्रथम नंबरचे टोकन व पावती आमदारांच्या हस्ते देण्यात आली. या भात खरेदी केंद्राच्या उद्घाटनासाठी उल्हास बांगर,सुहास मोरे, दिपक पवार,अनिल घरत, सिमा घरत,अशोक मोरे, हरिभाऊ राऊत, संजय पवार, राहूल पवार, माजी आमदार तेलम, सेवा सोसायटीचे चेअरमन गणपत मेंगाळ, सचिव मधुकर कवटे, भुपेंद्र मोरे, श्याम राऊत, आबा देशमुख यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी वर्ग उपस्थित होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिल घरत यांनी केले तर सुत्रसंचालन श्री गोडांबे यांनी केले.



# 'ऑपरेशन धनुष्यबाण' सुरु ?

## उद्धव ठाकरेंना मोठा धक्का - जिल्हाप्रमुख सचिन कदम यांचा पक्षाला रामराम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

रत्नागिरी : ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना मोठा धक्का बसलाय. 40 वर्ष सोबत असलेले माजी जिल्हाप्रमुख सचिन कदम यांनी पक्षाला रामराम ठोकलाय. रत्नागिरीमध्ये ठाकरे गटाला आणखी धक्का बसल्याची माहिती आहे. माजी जिल्हाप्रमुख सचिन कदम यांनी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला जय महाराष्ट्र केलाय. वैयक्तिक कारणामुळे पदाचा आणि सदसत्त्वाचा राजीनामा दिल्याचे सचिन कदम यांनी म्हटलं आहे. भास्कर जाधव आणि सचिन कदम यांच्यात उघड संघर्ष होता. त्यामुळेच सचिन कदम यांनी हा निर्णय घेतला असल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, सचिन कदम यांच्या अचानक राजीनामामुळे रत्नागिरीतील उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत खळबळ उडाली आहे. चाळीस वर्ष शिवसेनेमध्ये सक्रिय काम केल्यानंतर सचिन कदम यांनी पक्षाला रामराम ठोकलाय. अनंत गीते आणि विनायक राऊत यांचा विश्वासू कार्यकर्ता म्हणून सचिन कदम यांची ओळख आहे. सचिन कदम यांच्या पुढच्या भूमिकेकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष आहे.

दरम्यान, सध्या कुठेही जाणार नसल्याची प्रतिक्रिया सचिन कदम यांनी दिली आहे. सचिन कदम यांचा शिंदेंच्या सेनेत प्रवेश करण्याच्या रत्नागिरी जिल्ह्यात चर्चा सुरु झाल्या आहेत. मात्र, सध्या कोणत्याही पक्षात जाणार नसल्याचे सचिन कदम यांनी एबीपी माझाशी बोलताना सांगितलं आहे.

ठाकरेंची साथ सोडून नेते आणि आमदार जाणार अशी चर्चा असताना उद्धव ठाकरे यांच जिल्हाप्रमुख आणि संपर्कप्रमुखांच्या बैठकीत वक्तव्य उद्धव ठाकरेंनी महत्त्वपूर्ण वक्तव्य केलंय. मी बाळासाहेबांना वडील म्हणून आणि पक्ष प्रमुख म्हणून ओळखत होतो. ते ज्या पद्धतीने लढले तसंच मी लढणार, ही लढाई अशी मी अर्धात सोडून मैदान सोडणारा नाही, असं उद्धव ठाकरे म्हणाले

# गीतासार



कार्पण्यदोषोपहतस्वभावः पृच्छामि त्वां धर्मसम्मूढचेताः ।
यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ॥२- ७॥

करुणाव्याप्त दैन्यामुळे ज्याचा मूळ स्वभाव नाहीसा झाला आहे व धर्माधर्माचा निर्णय करण्याविषयी ज्याची बुद्धी असमर्थ आहे, असा मी तुम्हाला विचारीत आहे की, जे साधन खात्रीने कल्याणकारक आहे, ते मला सांगा. कारण मी तुमचा शिष्य आहे. म्हणून तुम्हाला शरण आलेल्या मला उपदेश करा. ॥ २-७ ॥

न हि प्रपश्यामि ममापनुद्याद् यच्छोकमुच्छोषणमिन्द्रियाणाम् ।
अवाप्य भूमावसपत्नमृद्धं राज्यं सुराणामपि चाधिपत्यम् ॥२- ८॥

कारण, पृथ्वीचे शत्रुरहित व धनधान्यसमृद्ध राज्य मिळाले किंवा देवांचे स्वामित्व जरी मिळाले, तरी माझ्या इंद्रियांना शोषून टाकणारा शोक जो दूर करू शकेल, असा उपाय मला दिसत नाही. ॥ २-८ ॥

सञ्जय उवाच
एवमुक्त्वा हृषीकेशं गुडाकेशः परन्तप ।
न योत्स्य इति गोविन्दमुक्त्वा तूष्णीं बभूव ह ॥२- ९॥

संजय म्हणाले, हे परंतपा (अर्थात शत्रुतापना) राजा, निद्रेवर ताबा असणाऱ्या अर्जुनाने अंतर्यामी श्रीकृष्णांना एवढे बोलून मी युद्ध करणार नाही, असे स्पष्टपणे सांगितले व तो गप्प झाला. ॥ २-९ ॥

# प्रजासत्ताक दिनी रंगभूमीवर येणार ‘राष्ट्रग्रंथ’

लोकशाहीचा आत्मा म्हणजे भारतीय संविधान. देशाच्या विविधतेला एकत्र बांधून ठेवणारा आणि सामान्य नागरिकाला त्याच्या हक्कांची जाणीव करून देणारा हा दस्तऐवज. संविधानाच्या ७५व्या वर्धापन दिनानिमित्त, “राष्ट्रग्रंथ” हे विशेष नाटक यशवंत नाट्यमंदिर, माटुंगा येथे २६ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता सादर होणार आहे. या नाटकाचा निर्माता असलेला दर्शन महाजन याने एकाच दिवशी एकाचवेळी ३६ जिल्ह्यात ७५ महाविद्यालयांमध्ये आझाद हिंद गाथा या नाटकाचे ७५ प्रयोग केले होते तर ‘पृथ्वीचे शेतकरी’ या नाटकाची निर्मिती सुद्धा दर्शन महाजन याने केली होती. या नाटकाच्या निमिताने निर्माता दर्शन महाजन सांगतो ‘संविधान हा फक्त कायद्याचा दस्तऐवज नाही, तो लोकशाहीचा आत्मा आहे. ‘राष्ट्रग्रंथ’ या नाटकाद्वारे प्रेक्षकांना संविधानाशी भावनिक आणि वैचारिक स्तरावर जोडण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत. यालाच जोडून नाटकाचे दिग्दर्शक कुमार सोहनी यांनी सांगितले की, “हा नाट्यप्रयोग म्हणजे संविधानाचा इतिहास नव्हे, तर त्याचा समाजातील महत्त्वाचा प्रवास आहे. सामान्य माणसाच्या जीवनातील संविधानाचे योगदान समजून घेण्यासाठी हे नाटक महत्त्वाचे आहे.”

नाटकाची वैशिष्ट्ये:

“राष्ट्रग्रंथ” या दोन-अंकी नाटकात ५१ भूमिका साकारल्या जाणार असून, १९ हून अधिक कलाकारांच्या सहभागाने हे भव्यदिव्य नाटक सादर होईल. का पाहावे हे नाटक?

संविधानाच्या निर्मितीमागील संघर्ष, त्याचे महत्त्व आणि समाजातील त्याची भूमिका उलगडणारे हे नाटक प्रेक्षकांना प्रबोधनाचा आणि मनोरंजनाचा एक नवा अनुभव देईल.

शुभारंभाचा प्रयोग:


२६ जानेवारी २०२५, सकाळी ११ वाजता, यशवंत नाट्यमंदिर, माटुंगा. हे नाटक लोकशाहीच्या पायाला साक्ष देणाऱ्या प्रत्येकासाठी आवर्जून पाहावे असेच आहे.




स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन हे दोन आपले राष्ट्रीय सण आहेत हे आपणा सर्वांना माहीतच आहे या दिवशी देशभक्ती ओसंडून वाहत असते पण या दिवसा इतकाच आजचा दिवसही तितकाच म्हत्वाचा आहे हे अनेक लोकांना माहीत नाही. आज २५ जानेवारी आज राष्ट्रीय मतदार दिन.आजच्याच दिवशी भारतीय लोकशाहीचा पाया रचला गेला. आजच्याच दिवशी म्हणजे २५ जानेवारी १९५० रोजी भारत निवडणूक आयोगाची स्थापना झाली म्हणून हा दिवस संपूर्ण देशात राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जातो. भारतीय लोकशाहीने प्रत्येक सुजाण नागरिकाला मतदानाचा मूलभूत हक्क बहाल केला आहे. त्यामुळे मतदार यादीत नाव नोंदवून प्रत्येक नागरिकांनी निवडणुकीत आपले मतदान नोंदवून लोकशाही बळकट करावी असा उद्देश या दिवसामागे आहे. म्हणून या दिवशी भारत निवडणूक आयोग विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन मतदानासंदर्भात जनजागृती करते. या दिवशी १८ वर्ष पूर्ण झालेल्या नवीन मतदारांची नोंद करून त्यांना भारत निवडणूक आयोगाचे ओळखपत्र दिले जाते. मतदान हे प्रत्येक सुजाण नागरिकांचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. १८ वर्ष पूर्ण झालेल्या प्रत्येक नागरिकांना संविधानाच्या अनुच्छेद ३२६ नुसार मतदानाचा हक्क दिला आहे. मतदान करणे ही देखील देशसेवाच आहे. त्यामुळे जास्तीतजास्त लोकांनी मतदान करुन भारतीय लोकशाहीला बळकट करायला हवे मात्र आपल्या देशात आजही मतदार मतदानाबाबत गंभीर आहेत असे दिसत नाही. घटनाकारांनी मतदानाचा अधिकार बहाल करून देशवासियांना खूप मोठे अस्त्र दिले आहे पण दुर्दैवाने आजही लोकांना त्याचे महत्व नाही म्हणूनच आपल्या देशात कोणत्याही निवडणुकीत ६० टक्क्यांपेक्षा अधिक मतदान होत नाही याचाच अर्थ देशातील ४० टक्के मतदार मतदान करित नाहीत. भारतीय मतदारांचा मतदानाबाबतचा हा निरुत्साह लोकशाहीला मारक आहे. विशेष म्हणजे सुशिक्षित वर्गातच मतदानाविषयी निरुत्साह दिसून येतो. मतदानादिवशी राष्ट्रीय सुट्टी असते या दिवशी मतदान करण्याऐवजी सहकुटुंब सहलीला जाण्याचा ट्रेंड सुशिक्षित वर्गात दिसून येतो आपण एकट्याने मतदान केले नाही तर काय फरक पडणार असाच आविर्भाव या लोकांमध्ये दिसून येतो. जे मतदान करतात त्यातील काही लोक मतदान करण्याऐवजी आपल्या मताची विक्री करतात. रोटी, बोटी, आणि चपटीसाठी काही जण आपले मत अक्षरशः विकतात. अर्थात सर्वचजण असे करतात असे नाही. बहुतेक जण विचार करुन आपल्या देशासाठी, समाजासाठी योग्य अशा उमेदवाराला मतदान करतात हे ही नाकारून चालणार नाही अशा लोकांची संख्या वाढली पाहिजे. लक्ष्मी दर्शन झाल्यानंतरच मतदान करणारे लोक बाबासाहेबांनी दिलेल्या या अस्त्राचा दुरुपयोग करतात. या लोकांमुळेच लोकशाही कलंकित होत आहे. बाबासाहेबांनी हे अस्त्र आपल्या हाती देण्यासाठी किती कष्ट सोसले याचीही जाणीव या लोकांना नाही. संविधानात मतदानाचा मूलभूत हक्क समाविष्ट करून बाबासाहेबांनी आपल्याला सर्वात मोठा हक्क मिळवून दिला आहे. आपलव हा मतदानाचा पवित्र हक्क बजावून प्रत्येकाने लोकशाही बळकट करायला हवी. प्रत्येकाने मतदानाचा हक्क जबाबदारीने बाजावल्यास देशाचे भविष्य बदलू शकते. त्यामुळे प्रत्येकाने निराशावादी भूमिका सोडून जागरूकतेने व स्वयंस्फूर्तीने प्रत्येक निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावून राष्ट्रीय कार्यामध्ये आपला खारीचा वाटा उचलायला हवा. लोकशाहीचे बळकटीकरण करावयाचे असेल तर जागरुक मतदारांचा एक मोठा वर्ग अस्तिवात येणे आवश्यक आहे. त्यामुळे आपला देश विकसनशीलतेकडून विकसित देश होण्याकडे निश्चितच मदत होईल. १८ वर्षांपुढील सर्व सुजाण नागरिकांनी आगामी निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावला तरच राष्ट्रीय मतदार दिन साजरा केल्याचे सार्थक होईल.

- श्याम बसप्पा ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे

# तुमचा हृदय दर काय म्हणतोय ?



हार्ट रेट म्हणजे काय? हे तुम्हाला माहिती आहे का? नसेल माहिती तर चिंता करू नका. हार्ट रेट म्हणजेच हृदयगती ही शरीरासाठी अतिशय उपयुक्त गोष्ट आहे. हे आपल्या शरीरात 24 तास चालते. हे सांगते की आपले हार्ट रेट मिनिटाला किती वेळा धडधडत आहे. आणि ते किती सुरक्षित आहे. सामान्य हृदय गतीचा अर्थ असा आहे की आपले हृदय योग्यरित्या रक्त पंप करीत आहे. तर डेंजर हार्ट रेटमुळे हृदयाशी संबंधित समस्या वाढण्यास मदत होते.

हार्ट रेट म्हणजेच हृदय गतीचे दोन प्रकार आहेत. विश्रांती घेणार्या हृदय गतीला सामान्यत: स्थिर हृदय गती आणि सक्रिय हृदय गती म्हणतात. म्हणजे सक्रिय अवस्थेत हृदयाचे ठोके. हृदयगतीवर अनेक कारणांचा परिणाम होतो. हृदयगती वय, आरोग्याच्या समस्या, व्यायाम, औषधे आणि तणाव यावर कार्य करते. हृदयाची गती सामान्य असणे महत्वाचे आहे, तर धोकादायक हृदय गतीदीर्घकाळ दुर्लक्ष केल्यास हृदयरोग, स्ट्रोक किंवा हृदयविकाराच्या झटक्याची समस्या वाढू शकते.आपले हृदय निरोगी ठेवण्यासाठी वेळोवेळी तपासणी करून डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. हृदयगती आणि धोक्याचा दर यात काय फरक आहे आणि हृदयगती किती धोकादायक आहे हे जाणून घेऊया. आम्ही दिल्लीच्या वरिष्ठ हृदयरोगतज्ज्ञांशी बोललो. त्यातून शिकण्याचा प्रयत्न केला. जाणून घेऊया.सामान्य हृदय श्रेणी आणि धोकादायक हृदय गती मध्ये काय फरक आहे? सामान्य किंवा विश्रांती घेणारी हृदय श्रेणी विश्रांती हृदय गतीला सामान्य हृदय गती म्हणतात. निरोगी मनुष्यासाठी, विश्रांती अवस्थेत हृदयगती प्रति मिनिट 60-100 बीट्स दरम्यान असते. तर मुलांचे 10 ते 20 गुण अधिक असतात. मुलांच्या हृदयाची गती प्रति मिनिट 70-120 बीट्स दरम्यान असू शकते. जर आपण खेळाडूंबद्दल बोललो तर विश्रांती घेताना त्यांच्या हृदयाची गती प्रति मिनिट 40-60 बीट्सपर्यंत असू शकते.सक्रिय हृदय गती सक्रिय हृदय गतीचा अर्थ असा आहे की आपण काही काम करत असताना किंवा व्यायाम करत असताना आपल्या हृदयाची गती वेगवान गतीने धडधडते. या दरम्यान, 20 वर्षांचा हा खेळाडू प्रति मिनिट 100-170 बीट्सच्या दरम्यान असतो. 40 वर्षांच्या व्यक्तीसाठी हे 90-153 बीट्स प्रति मिनिट असू शकते.

धोकादायक हृदय गती असामान्य हृदय गतीला डेंजर हार्ट रेट म्हणतात. उदाहरणार्थ, अधूनमधून हृदयाचे ठोके, छातीत दुखणे आणि पेटके डेंजर हार्ट रेटच्या श्रेणीत येतात. अशा परिस्थितीत हृदयरोगाचा धोका वाढतो. या काळात रुग्णाला हृदयविकाराचा झटका किंवा हृदयविकाराचा धोका वाढू शकतो. आरामशीर अवस्थेत हृदयाचे ठोके प्रति मिनिट 60 बीट्सपेक्षा कमी झाले आणि यामुळे थकवा, चक्कर येणे किंवा श्वास लागणे होत असेल तर ते धोक्याचे लक्षण असू शकते. त्याचबरोबर हृदयाचे ठोके प्रति मिनिट 100 बीट्सपेक्षा जास्त असतील तर ते डेंजर हार्ट रेटच्या श्रेणीत मोडते. हे अटॅक, हृदयरोग किंवा गंभीर आजार दर्शवू शकते. अशा वेळी तातडीने डॉक्टरांशी संपर्क साधावा. रुग्णाने डॉक्टरांपासून काहीही लपवू नये. तुम्हाला जी काही समस्या येत असेल ती उघडपणे डॉक्टरांसमोर ठेवा.

# उल्हासनगरमधील व्हीटीसी स्टेडियमचे काम प्रलंबित

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर :उल्हासनगर मध्ये कॅम्प नंबर चार मधील आधी व्हीटीसी स्टेडियमच्या नावाने प्रसिद्ध असलेल्या मैदानात बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल उभारण्याचे काम गेली ४ वर्षांपासून सुरू आहे. मात्र ते काम अलीकडच्या काळात ठप्प पडले असून या कामात दिरंगाई करणार्या ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांची उदासीनता पाहता नवनियुक्त आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी कंत्राटदार झा.पी.एंड कंपनीसह इतर दोन कंपन्यांना कारणे दाखवा नोटीसा बजावल्या आहेत.

या कामाचा प्रारंभ आदेश २७/०१/२०२१ रोजी जारी झाला होता; पण चार वर्षे उलटूनही या स्मारक आणि स्टेडियमच्या बांधकामा त काही खास प्रगती झाली नाही आणि ते अधुरेच पडले आहे. या पार्श्वभूमीवर नुकतीच नवनियुक्त आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी या बांधकाम कामांची पाहणी केली.

या पाहणीदरम्यान त्यांच्या निदर्शनास आले की, अनेक दिवसांपासून हे बांधकाम पूर्णपणे बंद आहे. यामुळे त्यांनी तीव्र संताप व्यक्त केलाय. २०२१ च्या जानेवारी महिन्यात जारी झालेल्या कामाच्या आदेशानुसार, या व्हीटीसी क्रीडा संकुलात इनडोर आणि आउटडोर




खेळांसाठी मूलभूत सुविधांसह स्टेडियम बांधण्याचे काम एका ठेकेदाराकडे देण्यात आले होते. पण आयुक्तांनी या जागेची पाहणी केली तेव्हा त्यांना असे आढळले की, तिथे ना कामगार होते ना कर्मचारी. संबंधित ठेकेदाराविरुद्ध तात्काळ कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे निर्देश अतिरिक्त आयुक्त किशोर गवस यांना दिले. त्यानुसार गवस यांनी झा पी एंड कंपनी आणि मे. एन ए कंस्ट्रक्शन प्रा. लि. यांच्याविरुद्ध नोटीस बजावली.

अतिरिक्त आयुक्त गवस यांनी बजावलेल्या नोटीसमध्ये असे म्हटले आहे की, व्हीटीसी क्रीडा संकुलाचे विकास करण्याची ही महत्वाकांक्षी योजना आहे आणि यासाठी शासना कडून निधीही उपलब्ध करून देण्यात आला आहे. ही योजना निश्चित वेळेत पूर्ण करणे अत्यंत गरजेचे आहे. पण ठेकेदाराकडून या कामात कोणतीही प्रगती दिसत नाही. इतकेच काय, बांधकाम स्थळी या योजनेचे नाव, अंदाजपत्रक आणि कोणत्या निधीतून हे काम सुरू आहे याची माहिती देणारा फलकही लावलेला नाही.

प्रशासनाने ठेकेदाराच्या या वर्तनाला बेजबादारीचे वर्तन’ असे म्हटले तसेच ही एक गंभीर बाब असल्याचे सांगितले आहे. अतिरिक्त आयुक्त गवस यांनी ठेकेदाराकडे कारण दाखवा नोटीस बजावून २४ तासांत उत्तर देण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच जर ठेकेदाराकडून समाधानकारक उत्तर मिळाले नाही तर कराराच्या अटीनुसार कठोर कारवाई करण्यात येईल असा इशारा ही चेतावनीही दिली आहे.

झापी अँड कंपनीच्या या आधीच्या इतर विभागातील कामांमध्येही अनेक तक्रारी प्रस्तावित आहेत. वाहन विभागातील कंत्राटी कामगारांचे त्यांनी केलेले शोषण , कामगारांचे वेतन व ईतर भत्ते यांची थकबाकी प्रलंबित आहे. यावरही लक्ष केंद्रित करण्याची मागणी कायद्याने वागा लोकचळवळीचे अध्यक्ष राज असरोंडकर यांनी आयुक्त मनीषा आव्हाळे यांच्या कडे केली आहे. नवनियुक्त आयुक्त मनीषा आव्हाळे यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे कामकाजातील ढिलाई करणाऱ्या शहरातील इतर ठेकेदारांचे धाबे दणाणले आहे.

## आरोग्य टिप्स

# बाजरीच्या पिठाचे पौष्टीक लाडू



बाजरीच्या पिठाचे लाडू साहित्य:

बाजरीचे पीठ
गूळ
वेलची पावडर
काजू, बदाम तुकडे
तूप

बाजरीच्या पिठाचे लाडू कृती:

बाजरीच्या पिठाचे लाडू बनवण्यासाठी, सर्वप्रथम कढईमध्ये तूप टाकून गरम करून घ्या. त्यानंतर त्यात बाजरीचे पीठ टाकून ते व्यवस्थित लालसर होईपर्यंत भाजा.

त्यानंतर भाजून घेतलेल्या पीठ बाजूला काढून त्याच कढईमध्ये तूप टाकून गूळ व्यवस्थित पातळ करून घ्या. गूळ वितळल्यानंतर त्यात भाजून घेतलेले बाजरीचे पीठ घालून मिक्स करा. नंतर त्यात वेलची पावडर आणि काजू, बदाम तुकडे टाकून मिक्स करा.तयार केलेले पिठाच्या तुमच्या आवडीनुसार लाडू बनवून सर्व्ह करा. तयार आहेत बाजरीचे लाडू.

# बाळासाहेबांचे महाराष्ट्रावर अनंत उपकार

– अरविंद वाळेकर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ :संयुक्त महाराष्ट्र चळवळी नंतरही मुंबईमध्ये परप्रांतीयांचा शिरकाव रोखण्यात व मराठी माणसाला अस्मिता प्रतिष्ठा आणि अस्तित्व प्राप्त करून देण्यात वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांची महत्त्वाची भूमिका आहे. त्यांच्यामुळे आज महाराष्ट्रात शिवसैनिक आणि मराठी माणसाचं राजकारण, समाजकारण, शैक्षणिक, आर्थिक, चित्रपटसृष्टीत महत्त्वपूर्ण स्थान आहे. त्यामुळे या महाराष्ट्रावर बाळासाहेबांचे अनंत उपकार आहेत हे इतिहास कधीही विसरू शकत नाही असे गौरवदार अंबरनाथ शिवसेना



शहरप्रमुख अरविंद वाळेकर यांनी काढले. अंबरनाथ शिवसेना शहर शाखेत आयोजित बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती उत्सवानिमित्त अभिवादन करताना शाखेत ते बोलत होते.

यावेळी वाळेकर यांच्या हस्ते बाळासाहेब ठाकरे यांच्या पुतळयाला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी शिवसेना शहरप्रमुख अरविंद वाळेकर, यांच्या सह माजी नगराध्यक्षा मनीषा वाळेकर, ज्येष्ठ शिवसैनिक नेते दाजी बनकर, माजी शिवसैनिक पद्माकर दिघे, प्रकाश डावरे, राजू शिर्के, अरविंद मालुसरे आदींसह शिवसेना शहर शाखेचे पदाधिकारी, महिला आघाडीचे नेते, कार्यकर्ते आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

व्यंगचित्रकार म्हणून विद्रोह करणाऱ्या बाळासाहेब ठाकरे यांनी १९ जुन १९६६ मध्ये महाराष्ट्राच्या राजकारणात शिवसेनेचा पाया रचला. मराठी माणसाचे राजकारण करतानाच ते हिंदुत्वाचे आणि मराठी अस्मितेचे रक्षक बनले. यासोबत मराठी साहित्य, संस्कृती, कला, परंपरा यांचे संरक्षण व संवर्धन करणारे ही अनेक उपक्रम त्यांनी आपल्या सत्तेच्या माध्यमातून चिरंतर राबवत ठेवले होते. नियत वयोमाना नुसार निधन झाल्याने बाळासाहेब ठाकरे यांच्या जाण्याने देशाच्या राजकारण व समाजकारणा त मोठी पोकळी निर्माण झाली आहे ती कधीही भरून न निघण्यासारखी असल्याची प्रतिक्रिया ही वाळेकर यांनी यावेळी व्यक्त केली

# ‘सडक सुरक्षा जीवन सुरक्षा’ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

## एक चांगला मदतकर्ता व्यक्ती व जवाबदार नागरिक कसे बनावे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मानवी जीवन अमूल्य आहे त्या जिवाला जपले पाहिजेल म्हणूनच श्री तिसाई मोटार ड्रायव्हिंग स्कूल आणि उप प्रदेशिक परिवहन कार्यालय, कल्याण यांनी मिळून मॉडेल कॉलेज मध्ये "सडक सुरक्षा जीवन सुरक्षा” या कार्यक्रमाचे औचित्य साधाले होते



भारतात वाढत्या लोक संख्ये मुळे लोकांच्या गरजा देखील वाढत चालल्या आहेत.त्यातील एक महत्वाची गरज म्हणजेच वाहन होय. वाहन चालक वाहतूक करत असताना नियमांचा पालन करत नाही. त्यामुळे बऱ्याचदा वाहन चालकचा अपघात होतो. त्यामुळे मोटार वाहन निरीक्षक अनिल धात्रक यांनी विद्यार्थ्यांना वाहनांचा अपघात कसा टाळावा याची थोडक्यात माहिति दिली होती.बरेचदा आपण वाहन चालवत असताना रस्त्या वरिल बंधनकारक चिन्हे, सावधान करणारी चिन्हे व माहिती देणारी चिन्हाण कडे दुर्लक्ष करतो. त्यामुळे “नियम पाळा अपघात टाळा” असे घोष वाक्य सांगितले. त्याच प्रमाणे सेफ्टी वेल्फेअर असोशिएशनचे संस्थापक विशाल शेटे यांनी देखील विद्यार्थ्यांना अपघात ग्रस्त व्यक्तीची मदत कशी करावी व राष्ट्रीय महामार्गावरील हेल्पलाईन क्रमांकाचे (१०३३) महत्व समजावून सांगितले.

या कार्यक्रम प्रसांगी उपस्तित श्री तिसाई मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे संचालक निलेश गायकवाड, मॉडेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेश ध्रुवांशी, मोटार वाहन निरिक्ष अनिल धात्रक, कार्यक्रम अधिकारी रवी शेडगे व मनिष कणखारे, उपकार्यक्रम अधिकारी सुदाम मोखाल व अजय ब्राह्मणे आणि आर एस पी शिक्षक सुभाष गायकवाड इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

# कल्याणमध्ये पाच बांगलादेशींना अटक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : पोलीस आयुक्त ठाणे शहर यांच्या आदेशाने बांगलादेशी नागरीकांवर कारवाईची मोहिम परिमंडळ ३ कल्याण हद्दीत सुरु असुन पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण मधील मानपाडा व महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन पोलीसांनी कारवाई करत ५ बांगलादेशी नागरिकांना अटक केली आहे.

मानपाडा पोलीस स्टेशन हद्दीत टाटानाका, देशमुख होम्स् जवळ, गांधीनगर झोपडपटटी, कल्याण पुर्व आणि महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन हद्दीत कल्याण पश्चिम रेल्वे परिसर या ठिकाणी बांगलादेशी नागरीक कोणत्याही कागदपत्राशिवाय




व भारत सरकारने विहीत केलेल्या मार्गाव्यतिरीक्त घुसखोरीच्या मार्गाने भारतात प्रवेश करुन बेकायदा वास्तव्यास असल्याबाबतची गोपनीय माहिती मिळाल्याने मानपाडा व महात्मा फुले चौक पोलीसांनी स्वतंत्र पथके तयार करुन दोन्ही ठिकाणी धाडी टाकुन पडताळणी केली असता एकुण ५ बांगलादेशी नागरिक विनापरवाना भारतात राहत असल्याने त्यांना अटक करण्यात आली आहे.

त्यानंतर त्यांची चौकशी करुन त्यांचेपैकी ४ बांगलादेशी नागरीकांवर मानपाडा पो.स्टे. आणि १ बांगलादेशी महिला नागरीकांवर महात्मा फुले चौक पो.स्टे. मध्ये गुन्हे दाखल केला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

# कौशल्य विभागासाठी 'दक्ष प्रकल्प'

## - कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : कौशल्य विकास विभागाच्या बळकटीकरणासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने सुरू होणारा 'दक्ष' (डेव्हलपमेंट अंडर अपलाईड नॉलेज अँण्ड स्कील्स फॉर हुमन डेव्हलपमेंट इन महाराष्ट्र) या प्रकल्पासाठी शासनाकडून गतीने कार्यवाही केली जाईल, अशी ग्वाही कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा व मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी जागतिक बँकेच्या प्रतिनिधींना दिली.

मंत्रालयात 'दक्ष' या प्रकल्पाबाबत जागतिक बँकेच्या प्रतिनिधींशी चर्चा करण्यासाठी माननीय मुख्य सचिव यांच्या दालनात बैठक आयोजित केली होती. यावेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्य सचिव सुजाता सौनिक, कौशल्य विकास विभागाचे सचिव गणेश पाटील, जागतिक बँकेचे भारताचे पथक प्रमुख प्रद्युम्न भट्टाचार्य, वरिष्ठ शिक्षणतज्ज्ञ डेनिस निकोलेव्ह यावेळी उपस्थित होते.

मंत्री श्री.लोढा म्हणाले की, कौशल्य विकास विभागातील महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी, राज्य कौशल्य विकास सोसायटी, राज्य कौशल्य आयुक्तालय, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ या सर्वांच्या कौशल्य विकासाच्या कामामध्ये एकसुत्रता येईल व काळानुरूप आवश्यक असलेले कौशल्य अभ्यासक्रम विकसीत करून जागतिक दर्जाचे कुशल मनुष्यबळ करण्याचा मानस 'दक्ष' या प्रकल्पातून घडेल, महिला व समाजातील प्रत्येक व्यक्तीला काळानुरूप कौशल्य विकसित करण्यावर या प्रकल्पातून भर देण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी नाविन्यता व कौशल्य विकास या संकल्पनावर भर देण्यासाठी सूचना केले आहे त्या अनुषंगाने जागतिक कौशल्य केंद्र विकसित करणे आणि नाविन्यता नगर वसविणे याबद्दल देखील या बैठकीत चर्चा करण्यात आली.या प्रकल्पासाठी लागणाऱ्या आवश्यक बाबींसाठी कौशल्य विभागाचे संकेतस्थळ अद्ययावत करण्यासाठी उच्च स्तरीय समितीच्या बैठकीत याबाबतीत निर्णय घेणे, 'दक्ष'प्रकल्प अंमलबजावणी कक्षासाठी तात्काळ ४५ मनुष्यबळाला मंजुरी देणे व या प्रकल्पासाठी सर्व विभागांचा समन्वय आवश्यक आहे, अशी चर्चा मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्याशी मंत्री श्री.लोढा यांनी यावेळी केली.

मुख्य सचिव सुजाता सौनिक म्हणाल्या की, कौशल्य विकास विभागाला गती देणाऱ्या 'दक्ष'प्रकल्पासाठी सर्व विभागामध्ये समन्वय साधून उद्योगांच्या मागणीप्रमाणे काळानुरूप कौशल्य विकास करण्यासाठी शासन आग्रही आहे.या प्रकल्पाच्या अनुषंगाने सर्व निर्णयांना गती देण्यासाठी प्रयत्नशील आहोत.

जागतिक बँकेचे भारताचे पथक प्रमुख प्रद्युम्न भट्टाचार्य म्हणाले की, कौशल्य विकास विभागाच्या बळकटीकरणासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने सुरू होणारा 'दक्ष' प्रकल्प हा देशातील सर्वात उत्कृष्ट प्रकल्प ठरेल.काळानुरूप समाजातील शेवटच्या घटकाला उद्योगांच्या मागणीप्रमाणे शिक्षण देवून कुशल मनुष्यबळ तयार करण्यात येणार आहे. कौशल्य विकास विभाग व यामध्ये सहभागी सर्वांचा सक्रीय सहभाग आवश्यक असेल असेही त्यांनी सांगितले.

# पदवी नसतानाही रुग्णसेवा

## उल्हासनगरात डॉक्टरवर गुन्हा दाखल



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर :जवळील वैद्यकीय सेवेची पदवी, नोंदणी प्रमाणपत्र स्वताहून महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे जमा करून वैद्यकीय व्यवसाय करण्याची कोणतीही परवानगी नसताना उल्हासनगर ४ मधील पेन्सिल फॅक्टरीजवळ राम सर्जिकल नावाने दवाखाना चालवून रुग्ण सेवा करत असलेल्या डॉ. रामदास भोईर यांच्यावर वैद्यकीय परिषदेच्या आदेशावरून उल्हासनगर महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाने विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात गुरुवारी (ता.१६) गुन्हा दाखल केला आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेचे प्रबंधक डॉ. डी. यु. वांगे यांचे आणि डॉ. राकेश गाजरे यांचे उल्हासनगर पालिकेला चार वर्षापूर्वी उल्हासनगर शहरात वैद्यकीय पदवी जवळ नसताना रुग्ण सेवा देणाऱ्या बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्यासाठी एक पत्र प्राप्त झाले होते. या पत्राच्या अनुषंगाने कारवाई करण्यासाठी उल्हासनगर पालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. मोहिनी धर्मा, डॉ. विद्या चव्हाण, डॉ. उत्कर्षा शिंदे, यश ननावरे, राजाराम केदार आणि इतर कर्मचारी असे पथक उल्हासनगर ४ मधील पेन्सिल फॅक्टरीजवळ राम सर्जिकल नावाने दवाखाना चालविणाऱ्या डॉ. रामदास भोईर यांच्या दवाखान्यात अचानक गेले.पथकाने त्यांच्या दवाखान्यातील वैद्यकीय साहित्य, कागदपत्रे, वस्तुंची तपासणी केली. त्यामध्ये ॲलोपथी औषधांचा साठा पथकाला आढळून आला. ते वैद्यकीय पदवी जवळ नसताना वैद्यकीय व्यवसाय करत असल्याचे पथकाच्या निदर्शनास आले, असे पोलीस ठाण्यातील तक्रारीत उल्हासनगर पालिकेच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. उत्कर्षा शिंदे यांनी म्हटले आहे.महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या पत्राप्रमाणे डॉ. रामदास भोईर यांनी त्यांची वैद्यकीय प्रमाणपत्र, नोंदणी प्रमाणपत्र (क्र. १४३०७) स्वताहून वैद्यकीय परिषदेकडे जमा केले आहे. तरीही जवळ वैद्यकीय पदवी नसताना ते बेकायदा वैद्यकीय व्यवसाय करून रुग्णांची फसवणूक करत असल्याचे आढळून आले. त्यामुळे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. धर्मा यांच्या आदेशावरून वैद्यकीय अधिकारी डॉ.उत्कर्षा शिंदे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या सह वैद्यकीय व्यावसायिक अधिनियमान्वये डॉ.रामदास भोईर यांच्यावर गुन्हा दाखल केला. डॉ. भोईर यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

# भिवंडी महानगरपालिकेत राष्ट्रीय मतदार दिन साजरा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी :आज दिनांक २४ .०१.२०२५ रोजी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या मुख्यालयात भारत निवडणूक आयोग व मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्या निर्देशानुसार प्रशासक तथा आयुक्त श्री . अजय वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला . यावेळी अतिरिक्त आयुक्त श्री विठ्ठल डाके यांनी नवमतदार नोंदणी, संक्षिप्त मतदार पुनरिक्षण कार्यक्रम, मतदानाचे लोकशाहीच्या बळकटीकरणात असलेले महत्व, पारदर्शी निवडणूक प्रक्रिया राबविण्यासाठी शासकिय कर्मचाऱ्यांच्या सहभागाचे महत्व विषद केले . त्याचप्रमाणे सर्व उपस्थितांना राष्ट्रीय मतदार दिनाची शपथ देण्यात आली . यावेळी उपायुक्त डॉ . अनुराधा बाबर, शहर अभियंता जमील पटेल, सहायक आयुक्त नितीन पाटील, राजेन्द्र वरळीकर, अजित महाडिक, प्रकाश राठोड, अंतर्गत लेखा परीक्षक नंदकुमार चौधरी, व अन्य वरिष्ठ अधिकारी तसेच मोठ्या संख्येने महानगरपालिका कर्मचारी उपस्थित होते .

# भिवंडी पंचायत समितीवर श्रमजीवीचा हंडा मोर्चा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी :भिवंडी तालुक्यात जनजीवन मिशन योजनेचा पूरता बोजवारा उडाला असून करोडोंचां चूराडा करूनही घरात पाड्यातील कूटुबांना पाणी मिळाला नसल्याने ते पाणी मिळावे या मागणीसाठी शनिवारी श्रमजीवी संघटना भिवंडी तालुक्याचे वतीने भिवंडी पंचायत समातीवर हंडामोर्चा काढण्यात येणार असल्याने प्रशासनाची तारांबळ उडाली आहे, शासनाच्या जलजीवन मिशन अंतर्गत हर घर जल देण्याचा कार्यक्रम सूरू होता, चार सप्टेंबर २०२०, च्या शासन निर्णयानुसार सर्व कूटूबांतील घरात,पाड्यात,बंगल्यात,



घरकूलात,पाणी पूरवठा मिळाला पाहिजे अशी योजना आहे, १५ व्या वित्त आयोग व पेसा मधून पाणीपुरवठ्यासाठी करोडोंचा खर्च करण्यात आला आहे, काम पूर्ण करण्यातसाठी दोन वेला मूदत वाढवून देण्यात आली ती मूदत सन २०२३ पर्यंत वाढवून देऊनही जनजीवन मिशन व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांच काम पूर्ण झालेले नसल्याने या बाबत पंचायत सिमीती प्रशासनाने काय कार्यवाही केली आहे, गरिब आदीवासीबांधवाना त्यांच्या हक्काचे पाणी कधी मिळणार याचा जाब विचारण्यासाठी संघटनेच्या वतीने प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला पंचायत समितीवर धडकणार असल्याच लेखी निवेदन गटविकास अधिकारी यांना दिले असल्याची माहीती संघटनेचे शहर तालूका अध्यक्ष सागर देसक, भिवंडी ग्रामीण तालूका अध्यक्ष सूनिल लोने, सेक्रेटरी तानाजी लहागे, आशा भोईर यांनी दिली,

# जिल्ह्यातील विकासात्मक प्रकल्प गतीने पूर्ण करावेत


## -मुख्य सचिव तथा पालक सचिव सुजाता सौनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : आपल्या कार्यालयात येणाऱ्या सर्वसामान्य जनतेचे काम झाले पाहिजे, त्यासाठी सर्वांनी सकारात्मक भावना ठेवाव्यात. आलेल्या तक्रारींचे निवारण सकारात्मकतेने करा, आणि जिल्ह्यातील प्रकल्प गतीने पूर्ण करावेत, असे निर्देश मुख्य सचिव तथा ठाणे जिल्हा पालक सचिव सुजाता सौनिक यांनी आज येथे दिले.

जिल्हाधिकारी कार्यालय येथे आज राज्याच्या मुख्य सचिव तथा ठाणे जिल्ह्याच्या पालक सचिव सुजाता सौनिक (भा.प्र. से.) यांच्या अध्यक्षतेखाली 100 दिवस कृती आराखड्यासंदर्भात आढावा बैठक संपन्न झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरभ राव, ठाणे शहर पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त कैलास शिंदे, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आयुक्त डॉ.इंदूराणी जाखड, मीरा-भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त संजय काटकर, उल्हासनगर महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती मनिषा आवळे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, मुख्य कार्यकारी अधिकारी झो.पु.प्रा. ठाणे पराग सोमण, सिडको 1 चे सहव्यवस्थापकीय संचालक शंतनू गोयल, आदिवासी विकास ठाणे अपर आयुक्त दीपक कुमार मीना, सिडको 2 चे सहव्यवस्थापकीय संचालक राहुल कर्डीले, कल्याण स्मार्ट



सिटी मुख्य कार्यकारी अधिकारी माधवी सरदेशमुख, भिवंडी महानगरपालिकेचे आयुक्त अजय वैद्य, नवी मुंबईचे सह पोलीस आयुक्त संजय यनपुरे, मीरा-भाईंदरचे पोलीस आयुक्त मधुकर पांड्ये, सह पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक डॉ.डी.स्वामी, डीसीएफ शहापूर दीपेश मल्होत्रा, कांदळवन डीसीएफ शैलेशकुमार जाधव, वनसंरक्षक अनिता पाटील, ठाणे उपवनसंरक्षक सचिन रेपाळे प्रवर्ग डाकघर अधिकारी समीर महाजन,अप्पर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे हे उपस्थित होते.

या बैठकीत मुख्य सचिव तथा ठाणे जिल्हा पालक सचिव सुजाता सौनिक यांनी क्षेत्रीय कार्यालयासाठी आगामी 100 दिवसांमध्ये 7 कलमी कृती आराखड्याप्रमाणे प्रभावी कार्यवाही करणे, राज्य सेवा हमी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे, माहितीचा अधिकारी 2005 ची प्रभावी अंमलबजावणी करणे, CPGRAM प्रणालीद्वारे प्राप्त झालेल्या तक्रारींचे निराकरण करणे आदी विषयांचा आढावा घेतला.

मुख्य सचिव तथा ठाणे जिल्हा पालक सचिव श्रीमती सौनिक पुढे म्हणाल्या की, मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या या कृती आराखड्याची गुड गव्हर्नन्ससाठी प्राधान्याने अंमलबजावणी करावी. ठाणे जिल्ह्यातील प्रकल्प हे वेळेत व अधिक गतीने पूर्ण होतील, असे पाहावे. काही अडचण असल्यास माझ्याशी संपर्क साधावा. प्रत्येक प्रकल्पाच्या संबंधित यंत्रणांनी याकडे जातीने लक्ष देऊन प्रकल्प वेळेत पूर्ण करावेत.

बैठकीच्या सुरुवातीला कोकण विभागीय आयुक्त राजेश देशमुख आणि जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी मुख्य सचिव तथा पालक सचिव सुजाता सौनिक यांचे स्वागत केले.

तसेच श्री.शिनगारे यांनी क्षेत्रीय कार्यालयासाठी आगामी 100 दिवसांमध्ये 7 कलमी कृती आराखड्याप्रमाणे प्रभावी कार्यवाही करणे, राज्य सेवा हमी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणे, माहितीचा अधिकारी 2005 ची प्रभावी अंमलबजावणी करणे, CPGRAM प्रणालीद्वारे प्राप्त झालेल्या तक्रारींचे निराकरण करणे आदी विषयांची संगणकीय सादरीकरणाद्वारे मुख्य सचिव तथा पालक सचिव महोदयांना माहिती दिली.

## कल्याण विकास फाऊंडेशनच्या माध्यमातून

# 'कल्याण रत्नांच्या' कुटुंबीयांचा होणार सन्मान




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर :आपल्या उत्तुंग कार्यकर्तृत्वाने कल्याण शहराला नावलौकिक प्राप्त करून देत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वतःचा ठसा उमटवणाऱ्या अनेक महनीय व्यक्ती या शहराने दिल्या आहेत. या महनीय व्यक्तींच्या कार्याचा गौरव करण्यासाठी माजी आमदार नरेंद्र पवार आणि हेमालता नरेंद्र पवार - कल्याण विकास फाऊंडेशनच्या यांच्या संकल्पनेतून 25 जानेवारी 2025 रोजी कल्याणात "ऋणानुबंध - एक कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच माजी आमदार नरेंद्र पवार आणि हेमालता नरेंद्र पवार - कल्याण विकास फाऊंडेशनच्या संकल्पनेतून साकारलेल्या "ऋणानुबंध - एक कृतज्ञता" या दिनदर्शिकेचे प्रकाशनही यावेळी करण्यात येणार आहे.

या दिनदर्शिकेमध्ये पहिल्या भारतीय महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी, आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके, सामाजिक कार्यकर्ते शंकरराव झुंजारराव, प्रा. राम कापसे, भगवानराव जोशी, दत्तात्रय धोंडीबा कदम, शिल्पकार भाऊ साठे, कृष्णराव धुळप, माधवराव काणे, मूर्तिकार विठ्ठल ईश्वाद, भारताचार्य चिंतामण विनायक वैद्य, सुप्रसिद्ध उद्योजक डी.पी. लोहार अर्थातच दत्तात्रय पांडुरंग पिंपळे अशा विविध क्षेत्रातील 12 विभूती आणि त्यांच्या कार्याची ओळख करून देण्यात आली आहे. कल्याण शहराच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, वैद्यकीय, शिक्षण, कला, सहकार आणि अन्य क्षेत्रात या व्यक्तींनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

मात्र काळाच्या ओघात ही कल्याण रत्नं विस्मृतीत जाऊ नये आणि नव्या पिढीला त्यांच्या उत्तुंग कार्याची ओळख होऊन प्रेरणा मिळण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमात कल्याण - डोंबिवली आयुक्त श्रीमती. इंदुराणी जाखड यांच्या प्रमुख उपस्थितीत 12 महनीय व्यक्तींच्या कुटुंबातील एका व्यक्तीचा कल्याण विकास फाऊंडेशनच्या माध्यमातून सन्मान करण्यात येणार आहे. येत्या शनिवारी 25 जानेवारी 2025 रोजी कल्याण पश्चिमेतील सुभेदार वाडा शाळेमध्ये केडीएमसी आयुक्त डॉ. इंदू राणी जाखड यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत हा कृतज्ञता सोहळा पार पडेल. कल्याण शहरासाठी या मंडळींनी जे योगदान दिले आहे त्यांचे यानिमित्ताने कृतज्ञतापूर्वक स्मरण केले जाणार असल्याची माहिती आयोजक माजी आमदार नरेंद्र पवार यांनी दिली आहे.

# उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा मशिदींनी पालन करावे - चित्रा वाघ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मशिदींवरील भोंगे हे भक्तीचे प्रतीक नसून लोकांवर लादल्या जाणाऱ्या सक्तीचे प्रतीक असल्याचे मत भाजप महिला प्रदेशाध्यक्ष आणि आमदार चित्रा किशोर वाघ यांनी व्यक्त केले आहे. मुंबई उच्च न्यायालयाने मशिदींवरील भोंग्यांबाबत दिलेल्या निर्णयाचे त्यांनी स्वागत केले असून या आदेशाची अंमलबजावणी १०० टक्के केली जाईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

उच्च न्यायालयाचा निर्णय

मुंबई उच्च न्यायालयाने मशिदींवरील भोंग्यांच्या वापराबाबत कठोर निर्णय देत, धार्मिक स्थळांवर होणाऱ्या गैरसोयीच्या आवाजांवर निर्बंध घालण्याचा आदेश दिला आहे. या आदेशानुसार, पहिल्यांदा भोंग्याचा नियमभंग झाल्यास संबंधित मशिदीला समज देण्यात येईल; मात्र दुसऱ्यांदा भोंगा वाजवला, तर तो हटवण्यात येईल.

भाजप सरकारची ठाम भूमिका

आमदार चित्रा किशोर वाघ यांनी



स्पष्ट केले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकार न्यायालयाच्या या आदेशाची शंभर टक्के अंमलबजावणी सुनिश्चित करेल. त्यांनी असेही सांगितले की, या निर्णयामुळे समाजातील जिहादी वृत्तीच्या समाजकंटकांना चांगलीच अद्दल घडेल.

संविधानाचा आदर करण्याची गरज

आमदार वाघ म्हणाल्या, "भारताच्या संविधानाने सर्व नागरिकांना समान न्यायाचा अधिकार दिला आहे. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानानुसार वागणे प्रत्येकासाठी बंधनकारक आहे. आम्ही कोणत्याही समाजविघातक कृतींना थारा देणार नाही. कायद्याचे पालन करणाऱ्यांचे रक्षण करणे आणि नियम मोडणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे, हे सरकारचे कर्तव्य आहे."

सरकारची पुढील पावले

मशिदींवरील भोंग्यांच्या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासनाला निर्देश देण्यात आले आहेत. जिल्हास्तरावर पोलिस आणि महसूल अधिकाऱ्यांच्या माध्यमातून या आदेशाचा ठोस अंमल करण्यात येईल.

न्यायालयाच्या आदेशाचे स्वागत

चित्रा वाघ यांच्या या वक्तव्यामुळे भाजप समर्थक आणि कायद्याचे पालन करणाऱ्या नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. "आम्ही नेहमीच कायद्याचे पालन करत आलो आहोत. त्यामुळे हा निर्णय सर्वांसाठी स्वागतार्ह आहे," असे एका स्थानिक नागरिकाने सांगितले. या निर्णयामुळे धार्मिक स्थळांवरील भोंग्यांच्या अतिरेकी वापरावर नियंत्रण येईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. सरकारने सर्व घटकांना न्याय देण्याची भूमिका घेतली असून, भोंग्यांच्या वापराबाबतची नियमावली लवकरच स्पष्ट करण्यात येईल.

# ह.भ.प. गणपत पाटील यांच्या हस्ते फडकणार अबिटघर ग्राम पंचायतीचा तिरंगा ध्वज

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामिण : येत्या प्रजासत्ताकदिनी ग्रामपंचायत अबिटघर कार्यालयाचा तिरंगा ध्वज गावातील वारकरी संप्रदायातील जेष्ठ नागरिक ह.भ.प.गणपत शिड्डू पाटील यांच्या हस्ते फडकणार आहे.

वासिंद -वाडा रस्त्यावर असलेल्या आबिटघर ग्रामपंचायतीच्या सरपंच साक्षी संतोष साठे या ग्रामपंचायत माध्यमातून विकासात्मक कामे करण्याबरोबरच सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून समाजाला दिशा देण्यासाठी प्रयत्न करीत असतात. याच अनुषंगाने येत्या 26 जानेवारी या प्रजासत्ताक दिनानिमित्त गावातील सामाजिक, सांस्कृतिक तसेच सांप्रदायिक क्षेत्रात ज्यांनी आपला ठसा उमटविला आहे अशा व्यक्तींना सामाजिक तसेच सार्वजनिक पटलावर स्थान मिळवून देण्याच्या उद्देशाने सांप्रदायिक क्षेत्रात अर्थात वारकरी म्हणून गावाचा नावलौकिक वाढविणाऱ्या गावातील जेष्ठ नागरिक ह.भ.प.गणपत शिड्डू पाटील यांना ग्रामपंचायत कार्यालय येथील झेंडा फडकविण्याचा मान देण्यात आला आहे.

यासाठी ग्रामपंचायतीच्या सरपंच साक्षी संतोष साठे, उपसरपंच सुप्रिया सुनील पाटील, ज्येष्ठ सदस्य भरत गोविंद जाधव व संपूर्ण ग्रामपंचायत कार्यकारिणी यांनी नेहमीच सकारात्मक निर्णय घेतले आहेत. याच अनुषंगाने ह.भ.प. गणपत पाटील यांचा सन्मान होण्यासाठी सरपंच साक्षी संतोष साठे यांनी स्वतःचा झेंडा फडकविण्याचा मान आपल्या आधिकरात दुसऱ्या व्यक्तीला देण्याचा निर्णयाचे पंचक्रोशीत स्वागत होत असून या ग्रामपंचायत कार्यकारिणीने घेतलेल्या निर्णयाची प्रशंसा होत आहे.

# आदिवासी समाजाच्या समस्यांवर आढावा बैठक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई(प्रतिनिधी) : आदिवासी समाजांचा सांस्कृतिक वारसा, भाषा, कला आणि परंपरा जपणे आवश्यक आहे. यामुळे विविधता आणि सामाजिक समृद्धी टिकून राहते. आदिवासी समाजाच्या हक्कांचे संरक्षण आणि उत्कर्षासाठी शासन कटिबद्ध असल्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी सांगितले. आदिवासी समाजाच्या विविध समस्यांवर चर्चा करण्यासाठी विधानभवन येथे आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते.मंत्री श्री. उईके म्हणाले, वनहक्क जमीन पट्ट्याचे कायदे वेळोवेळी बदलत गेले. वन हक्क दावे हा विषय महसूल, वन विभाग आणि ग्रामविकास विभागाशी संबंधित आहे. या तिन्ही विभागासोबत लवकरच बैठक घेण्यात येईल. मुख्यमंत्री महोदयांकडे झालेल्या शंभर दिवस उपक्रम बैठकीमध्ये आदिवासी समाजाचे अनेक प्रश्न सुटले पाहिजेत यासाठी आराखडा तयार करण्यात आला आहे. यामध्ये वन हक्क जमीन हा मुद्दा तात्काळ सोडविण्यासाठी आदिवासी विकास विभाग प्रयत्न करेल. राज्य जनजाती सल्लागार परिषदेची बैठक लवकरच घेण्यात येईल. आदिवासी समाजातील प्रमुख मुद्दे, जसे की शिक्षण, आरोग्य, जमीन हक्क, आर्थिक विकास आणि सांस्कृतिक संवर्धन यावर लक्ष केंद्रित केले जाणार असल्याचे मंत्री श्री.उईके यांनी यावेळी सांगितले.

# मुरबाडकर धुळीच्या त्रासाने त्रस्त



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड: सध्या कल्याण -मुरबाड-नगर या राष्ट्रीय महामार्गाचे कॉंक्रीटकरणाचे काम एका मोठ्या कंपनीच्या नियंत्रणाखाली जोमाने सुरु आहे.धानिवली येथिल मुरबाडी नदीवरील नविन पुलाचे काम तसेच मुरबाडच्या तिन हात नाका येथे ओव्हर ब्रिजचे काम जोमाने सुरु असल्याने वाहतूक कोंडीतुन काही प्रमाणात सुटका झाली असली तरी धानिवली नदी ते सारिका हॉटेल पर्यंत नागरिकांना धुळीचा सामना मात्र रोज करावा लागत आहे. सध्या मुरबाड मधील उड्डाण पुलाचे गर्डर बसविण्याचे कामही सुरु असल्यामुळे मुरबाडकरांचे आरोग्यमान बिघडले असून अनेकांना श्वसनाचे, दम्याचे आजार उद्भवले आहेत. सदर कंपनी ठेकेदाराने रोडवर किमान रोज सकाळ -संध्याकाळ पाणी मारने गरजेचे असतानासुद्धा डोळेझाकपणा करीत आहे. संबधित ठेकेदार दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप स्थानिक मुरबाड कर व्यक्त करत आहेत.मुरबाड करांची या धुळीच्या साम्राज्यातून कधी सुटका होईल याकडे समस्त मुरबाडकरांचे लक्ष ठेऊन आहेत.

# कल्याणमध्ये संविधान साहित्य संमेलन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त कल्याण डोंबिवली महानगरपालिका व कडोंमपा बहुजन कर्मचारी परिवर्तन संस्था (रजि), कल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान साहित्य संमेलन २०२५ चे आयोजन रविवार दि. २६ जानेवारी रोजी सकाळी ९.३० ते रात्री १० वा. पर्यंत कल्याण (प.) येथील आचार्य प्र.के.अत्रे रंगमंदिर येथे करण्यात आले आहे.

या संविधान साहित्य संमेलन २०२५ मध्ये अनेक विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, याचा शुभारंभ दि. २६जानेवारी रोजी सकाळी ९.३०वा. उप आयुक्त रमेश मिसाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत कल्याण पश्चिमेतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथून संविधान रॅलीने होणार आहे. या रॅलीचे उद्धाटन महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांच्याहस्ते करण्यात येईल.

तद्नंतर सकाळी ११ वा. महापालिकेच्या आचार्य प्र.के.अत्रे रंगमंदिरात संमेलनाचे अध्यक्ष-जेष्ठ संविधान तज्ञ ॲड.डॉ.सुरेश माने व महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांच्या प्रमुख उपस्थितीत संविधान साहित्य संमेलनाचे उदघाटन होणार आहे. अमृत महोत्सवी संविधान साहित्य संमेलनात दुपारी १वा. जेष्ठ साहित्यिका डॉ.प्रज्ञा दया पवार व महापालिका उपायुक्त वंदना गुळवे यांची प्रकट मुलाखत जेष्ठ पत्रकार विजय चोरमारे यांचेमार्फत घेतली जाणार आहे.

दुपारी २.३० वा. कवी संमेलनाचे आयोजन करण्यात करण्यात आले असून, त्याचे अध्यक्ष स्थान जेष्ठ लेखक व कवी प्रा.शुक्राचार्य गायकवाड भूषविणार आहेत. दुपारी ४ वा. "संविधान स्तंभाच्या जबाबदा-या आणि वास्तव" या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले असून, जेष्ठ पत्रकार मधु कांबळे, मा.आमदार लहु कानडे, न्यायाधीश डॉ.डी. के.सोनावणे, माजी पोलीस आयुक्त डॉ.संजय अपरांती यांचा सहभाग राहणार आहे.

सायं. ६. वा. "मानवाच्या कल्याणाचा जाहिरनामा संविधान"* या विषयावर प्रा.डॉ.विष्णु मगरे यांचे अध्यक्षतेखाली परिसंवादाचे आयोजन करण्यात आले असून, यात साहित्यिक डॉ.मिलींद कसबे सहभागी होणार आहेत. तद्नंतर सायं. ७.३०वा. सम्मेलनाध्यक्ष डॉ.ॲड.सुरेश माने, महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ आणि महाराष्ट्राचे निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.संविधानाचे हे अमृत महोत्सवी वर्ष असल्याने संविधानावर विस्तृत चर्चा व विचार मंथन होणे अपेक्षित आहे त्यासाठी संविधान साहित्य सम्मेलन आयोजित केले आहे त्यामधील सर्व सत्रातील कार्यक्रमास सर्व नागरिकांनी उपस्थित राहून त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन या संमेलनाचे संयोजक चंद्रकांत पोळ यांचेमार्फत करण्यात आले आहे.

# बांधकामासाठी करता येणार जमीन खरेदी विक्री व्यवहार



सर्वसामान्य नागरिकांनी खरेदी केलेल्या एक, दोन, तीन किंवा चार-पाच गुंठे क्षेत्राचे तुकडे नियमित करण्यास प्रांताधिकाऱ्यांकडून मान्यता दिली जात आहे. त्यासाठी पूर्वी झालेल्या व्यवहाराच्या (दस्त) रेडिरेकनरच्या पाच टक्के रक्कम शुल्क म्हणून शासनाला भरावी लागणार आहे. त्यानंतर त्या गुंठ्याच्या खरेदी-विक्रीस परवानगी मिळेल; पण विहीर, घर बांधकाम व रस्त्यासाठीच त्या गुंठ्यांचे व्यवहार होतील.

१९४७ साली अमलात आलेल्या तुकडेबंदी कायद्यातील तरतुदीनुसार प्रत्येक जिल्ह्यासाठी प्रमाणभूत क्षेत्र ठरविण्यात आले. मात्र, या प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे हस्तांतरण करण्यास कायद्याने निर्बंध घालण्यात आले. यामुळे सर्वसामान्य नागरिकांसमोरील अडचणीत वाढ झाली आणि पैसे देऊनही अनेकांचे व्यवहार अडकून बसले. २०१७ साली केलेल्या सुधारणेनुसार १९६५ ते २०१७ या कालावधीत झालेले तुकड्यांचे व्यवहार नियमित करण्यासाठी बाजार मूल्याच्या २५ टक्के रक्कम शासनास जमा करण्याची अट घालण्यात आली. पण, ही रक्कम सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेरील असल्याने बहुतेक लोक समोर आलेच नाहीत. ही अडचण दूर करण्यासाठी विद्यमान सरकारने प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राची खरेदी- विक्री करून झालेले व्यवहार नियमित करण्यासाठी २०१७ सालापर्यंतची मुदत २०२४ पर्यंत वाढविली.

तसेच २५ टक्के शुल्काऐवजी पाच टक्के शुल्क भरून त्या जमिनी नियमित करण्याच्या प्रस्तावाला मान्यता दिली. मंत्रिमंडळाच्या मान्यतेनुसार राज्यपालांच्या संमतीने १५ आक्टोबर २०२४ रोजी अध्यादेशाही काढण्यात आला. त्याचे अधिनियमात रूपांतर करण्यासाठी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विधानपरिषद आणि विधानसभेत त्याचे विधेयक सादर केले. या विधेयकाला दोन्हीही सभागृहात मान्यता मिळाल्याने तुकडेबंदी कायद्यातील सुधारणेचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयाचा मोठा दिलासा राज्यातील नागरिकांना मिळणार असून, याबाबत महसूल विभागाने माजी सनदी अधिकारी उमाकांत दांगट यांच्या नेमलेल्या समितीच्या शिफारशीही यासाठी विचारात घेण्यात आल्या आहेत.

तुकड्यांच्या खरेदीसाठी शुल्क भरून नियमित करुन घेणे आवश्यक

तुकडेबंदी कायद्यानुसार प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी जमिनीच्या खरेदी-विक्रीवर निर्बंध होते. पण, आता land na records new rules त्या तुकड्यांचे व्यवहार नियमित करण्यासाठी बाजारमूल्याच्या पाच टक्के शुल्क शासनाला भरून एक, दोन, तीन, चार, पाच गुंठ्यांची खरेदी-विक्री आता करता येईल. त्यासाठी नगरपालिका, महापालिकेतील संबंधित अधिकारी किंवा ग्रामीणमधील प्रांताधिकाऱ्यांकडून गुंठेवारी नियमित झाल्याचे प्रमाणपत्र घ्यावे लागेल. प्रकाश खोमणे, मुद्रांक शुल्क जिल्हाधिकारी, सोलापूर

'या' तीन कारणांसाठी मिळेल परवानगी

- विहिरीसाठी गुंठेवारी खरेदी-विक्रीस परवानगी
- शेती किंवा अन्य रस्त्यांसाठीही गुंठ्यांची करता येईल खरेदी-विक्री

रहिवासी क्षेत्रात (रेसिडेन्शियल) घर बांधण्यासाठी देखील गुंठ्यांच्या व्यवहारास परवानगी

# रायगड जिल्ह्यात लेप्टोचे १७ रुग्ण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पेण : रायगड जिल्ह्यामध्ये नव्या वर्षातच लेप्टोचा धोका निर्माण झाला आहे. अलिबागसह पाच तालुक्यात लेप्टो बाधीत १७रुग्ण आढळून आले आहेत. त्यांच्यावर अलिबागमधील जिल्हा रुग्णालय पनवेल येथील एमजीएम रुग्णालयात उपचार सुरु असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. जिल्ह्यामध्ये बर्डफ्लू बरोबरच आता लेप्टो आजाराने डोकेवर काढण्यास सुरुवात केली आहे. दूषित पाण्यामध्ये बराच वेळ चालल्यामुळे तसेच प्राण्यांच्या विष्ठेच्या माध्यमातून होणाऱ्या या आजारावर योग्य वेळी उपचार न घेतल्यानेही लेप्टोचा धोका असतो. उंदीर, घुशी यासारख्या प्राण्यांच्या वाढीवर निर्बंध न राहिल्यामुळे लेप्टोस्पायरोसिसचे प्रमाण वाढल्याची शक्यता आहे. जिल्हयात गेल्या काही दिवसांपासून लेप्टोचे रुग्ण सापडू लागले आहेत. १ ते १८ जानेवारी या कालावधीत १७ जणांना लेप्टोची बाधा झाल्याची माहिती जिल्हा रुग्णालयाकडून उपलब्ध झाली आहे. रुग्णांना अलिबागमधील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. त्यापैकी नऊ जणांची प्रकृती चांगल्या असल्याने त्यांना उपचार करून सोडण्यात आले आहे. एका रुग्णाला पनवेल येथील एमजीएम रुग्णालयात अधिक उपचारासाठी पाठवण्यात आले आहे.त्याची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात आलेआहे.जिल्हारुग्णालयात बाह्य रुग्ण कक्षात झालेल्या तपासणीमध्ये सहा रुग्ण लेप्टोस्पायरोसिस संशयीत असून त्यांची प्रकृती चांगली असल्याचे सांगण्यात आले आहे. रायगड जिल्ह्यातील अलिबाग पेण, माणगाव, रोहा, मुरूड या तालुक्यातील रुग्ण सापडले आहेत. त्यात अलिबागमधील सात, पेण, मुरूडमधील प्रत्येकी दोन, रोहा, माणगावमधील एक लेप्टोसायरोसिस रुग्ण असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. हे सर्व रुग्ण ग्रामीण भागातील असल्याचे सांगण्यात आले.

# गॅलेक्सी हॉस्पिटलचे सुनील तटकरेंच्या हस्ते उदघाटन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पेण :पेण शहरात सर्व सोयीनिशी सुसज्य अशा गॅलेक्सी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे शानदार उद्धाटन बुधवारी सायंकाळी रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी उदघाटन प्रसंगी बोलताना सांगितले की उपचारासाठी आपल्याला मुंबईतील मोठमोठ्या हॉस्पिटलमध्ये जायला लागत होते परंतु आता पेणमधील नव्या जागेत झालेल्या गॅलेक्सी मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल हे अत्याधुनिक उपकरणाने सुसज्ज असे हॉस्पिटल असल्याने उपचारासाठी मुंबई जाण्याची गरज न भासता मुंबईतील रुग्ण उपचारासाठी गॅलेक्सी हॉस्पिटलमध्ये येतील अशी सुसज्य व्यवस्था इथे आहे तर या हॉस्पिटलचे नाव शासनाच्या आरोग्य विषयी योजनांच्या यादीत येण्यासाठी ही पुढील काळात पाहिले जाईल असे प्रतिपादन खासदार सुनील तटकरे यांनी केले. तसेच पेणमध्ये औद्योगिकरण व नागरीकरण वाढवून विकासाला चालना मिळणारे तसेच पेण रेल्वे स्थानकात लांब पल्ल्याच्या गाड्या तसेच मेमो यांना थांबा मिळेल यासाठी रेल्वेमंत्री यांच्याकडे चर्चा करून प्रयत्न करण्यात येत असल्याचे ही खासदार तटकरे यांनी सांगितले.

यावेळी व्यासपीठावर खासदार सुनील तटकरे भाजपा उपजिल्हाध्यक्ष वैकुंठ पाटील, माजी आमदार अनिकेत तटकरे, सौ.वेदांती तटकरे,मिलिंद पाटील,हॉस्पिटलचे मालक संचालक डॉक्टर रत्नदीप गवळी, राजेश टेलर ,रोहन पंदारे,डॉ.तन्वी पंदारे, नरेंद्र ठाकूर,यशवंतदादा घासे,निवृत्ती पाटील,दत्ता कांबळे आदि मान्यवर उपस्थित होते.

**तीन वर्षात ११ हजार रुग्णांवर उपचार**

तीन वर्ष पेणकरांनी आम्हाला प्रेम दिले या तीन वर्षात गॅलेक्सी हॉस्पिटल मधून ११ हजार रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत.यापुढे ही रुग्णांना गॅलेक्सी हॉस्पिटल मधील डॉक्टर,स्टाफ यांच्या योग्य देखरेखी खाली उपचार देण्यात येतील असे उद्गार हॉस्पिटलचे मालक संचालक डॉक्टर रत्नदीप गवळी यांनी बोलताना सांगितले.गॅलेक्सी हॉस्पिटलचे मालक संचालक राजेश टेलर यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मानले.

# कोळसेवाडी पोलिसांचे व्यापाऱ्यांना मार्गदर्शन




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : कोळशेवाडी पोलीस स्टेशन हद्दीतील ज्वेलर्स असोसिएशन व व्यापारी यांची बैठककल्याण पूर्वेतील प्रसाद हॉटेल येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत कोळसेवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कदम यांनी सुरक्षितेबाबत ११२ नंबर बाबत योग्य त्या सूचना देऊन मार्गदर्शन केले. तसेच कॅमेरे देशासाठी, एक कॅमेरा समाजासाठी या संकल्पनेनुसार सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याबाबत सूचना देऊन डिजिटल अरेस्ट सायबर क्राईम, हॉलमार्क फसवणूक या बाबत मार्गदर्शन केले. याठिकाणी 30 ते 35 ज्वेलर्स दुकानदार,मालक व्यापारी उपस्थित होते

# जिल्हा परिषदेत 'राष्ट्रीय मतदार दिवस' साजरा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
ठाणे : दि.25 जानेवारी 2025 रोजी 15 वा 'राष्ट्रीय मतदार दिवस' राज्यस्तर, जिल्हास्तर व मतदान केंद्र स्तरावर साजरा करावयाचा असल्याने त्यानुषंगाने आज, दि. 24 जानेवारी, 2025 रोजी सकाळी 11 वाजता जिल्हा परिषदेच्या प्रांगणात सामुहिक मतदान शपथ घेण्यात आली.या 15 व्या राष्ट्रीय मतदार दिवसासाठी "Nothing like voting. I Vote for sure" हा विषय (Theme) आयोगाकडून देण्यात आला असून सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी मतदानाचा हक्क बजावावा व मतदानाबाबत जनजागृती करावी, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले. यावेळी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, जिल्हा परिषदेचे सर्व विभाग प्रमुख तसेच सर्व अधिकारी - कर्मचारी आदी उपस्थित होते. "आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे, प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करु आणि मुक्त निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणूकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणूकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करु." ही सामुहिक शपथ यावेळी घेण्यात आली.

# मोबाईलचा अतिवापर विद्यार्थिनीच्या जीवावर बेतला



दै. ठाणे जीवनदीप वार्ता
पालघर : पश्चिम रेल्वेच्या सफाळे स्थानकाजवळ धक्कादायक घटना घडली. माकणे गावातील १६ वर्षीय विद्यार्थिनी वैष्णवी रावल हिचा ट्रेनच्या धडकेत मृत्यू झाला. ती इयत्ता नववी मध्ये शिकत होती. गुरुवारी साधारण एक ते दीडच्या सुमारास ही घटना घडली. कानात इअरफोन घालून रेल्वे रूळ ओलांडत असताना गुजरातकडे जात असलेल्या राजधानी एक्सप्रेसने तिला धडक दिली.या अपघातात तिचा जागीच मृत्यू झाला. वैष्णवी ही एकुलती एक मुलगी असल्याने तिच्या पालकावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. तसेच सर्व परिसरात सुध्दा दुःख व्यक्त करण्यात येत आहे.

# ७ कलमी कृती आराखडा राबविण्याचे केडीएमसी आयुक्तांचे निर्देश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार १०० दिवसांमध्ये ७ कलमी कृती आराखडा प्रभावीपणे राबविण्यासाठी कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी नियोजनबध्द कार्यवाही करून अंमलबजावणी करण्याचे निर्देश सर्व अधिकारी वर्गास दिले आहेत. त्याअनुषंगाने महापालिकेच्या संकेतस्थळावरील माहिती अदयावत करण्यात येत असून त्यामध्ये आर.टी. एस. व आर.टी.आय ची माहिती उपलब्ध करून देण्यात येत आहे.

नागरिकांना मालमत्ताकरां विषयी विविध सेवा घेताना येणारा त्रास कमी करण्यासाठी परिवर्तन योजना महापालिकेमार्फत राबविण्यात येत आहे. नगररचना विभागाकरीता सुलभ एस.ओ.पी. (सर्व साधारण पध्दती) निर्धारित करून दिल्यामुळे नागरिकांचा महापालिकेसोबतचा व्यवहार सुलभ आणि पारदर्शक होणार आहे.

या कृती आराखडयाच्या अंमलबजावणीसाठी आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी सर्व खाते, विभाग प्रमुखांसमवेत बैठक घेवून आपापले कार्यालय स्वच्छ ठेवण्याबाबत व भंगार सामानाची विल्हेवाट लावण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्याचप्रमाणे प्रत्येक विभाग, प्रभागात स्वच्छतेबाबत नियोजन करण्यात आले आहे. जुन्या वाहनांसंदर्भात आर.टी.ओ. सोबत आवश्यक पत्रव्यवहार करून सदर वाहने निर्लेखित करण्याबाबत आर.टी.ओ. विभागाच्या समन्वयाने कार्यवाही करण्याबाबतही त्यांनी निर्देश दिले आहेत.नागरिकांच्या तक्रारींचे शिघ्रगतीने निवारण करण्यासाठी महिन्याच्या दुस-या मंगळवारी जनता दरबाराचे आयोजन करण्यात येत आहे आणि ४ थ्या मंगळवारी सफाई मित्र दरबाराचे आयोजन करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे देखील आयोजन करण्यात येत आहे.राज्यसेवा हमी कायदयाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने महापालिकेने प्रथम सन २०१५ च्या आदेशानुसार शासनाकडील १५ सेवा अधिसुचित केल्या. तद्नंतर जून २०२३ च्या आदेशानुसार शासनाकडील १२ आणि महापालिकेकडील ५ अशा १७ सेवा अधिसुचित करण्यात आल्या. ऑगस्ट २०२३ च्या आदेशानुसार महापालिकेकडील ४४ आणि शासनाकडील ३१ अशा ७६ सेवा नागरिकांसाठी अधिसुचित करण्यात आल्या आणि जुन २०२४ च्या आदेशानुसार शासनाच्या ६८ आणि महापालिकेच्या ४९ अशा एकूण ११७ सेवा महापालिकेने अधिसुचित केल्या आहेत. याबाबतचे फलक सर्व नागरी सुविधा केंद्र आणि विभागात लावण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

नियमित वाचा
दै. ठाणे
जीवनदीप वार्ता

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 g Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अॅड. जयकुमार ए. रिजवानी